# प्रेसनोट दि. १२/०६/२०१९

## घाटकोपर येथील खुन झालेल्या बबुल दुबेच्या साथिदारास पिस्टल व जिवंत काडतुसासह युनिट-१ गुन्हे शाखा यांचेकडून पुण्यात अटक

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि.१२/०६/२०१९ रोजी युनिट-१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील स्टाफ समर्थ पो.स्टे.चे हद्दीत खाजगी वाहनाने गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना पोहवा अजय थोरात यांना त्यांचे बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की एक निळसर रंगाचा फुलबाहयाचा शर्ट व निळसर रंगाची जीन पॅंट असे कपडे घातलेला मजबुत बांध्याच्या इसमाने कमरेला पिस्टल खोचले असुन तो पंडित नेहरु रोड रामोशीगेट चौकाजवळ उभा आहे. तो कंबरेला सारखा हात लावत आहे.

अशी बातमी मिळताच स्टाफसह सदर बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा रचुन सदर इसमास ताब्यात घेवून त्यास नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव रुपेश एकनाथ सातपुते, वय २४ वर्ष, रा संजय गांधी नगर आंबेडकर चौक, पंतनगर, घाटकोपर,मुंबई पुर्व, मुंबई ७५ असे असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे डावे बाजूचे कमरेस खोचलेले एक लोखंडी धातूचे गावठी पिस्टल व ३ जिवंत काडतूसे असा ४०,६००/- रु किं चा माल मिळुन आल्याने समर्थ पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी व जप्त मुद्देमाल समर्थ पो.स्टे.यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरचा आरोपीकडे अधीक तपास करता सदर आरोपीचा साथिदार बबलु दुबे याचा मे २०१९ मध्ये घाटकोपर येथे गोळया घालुन खुन करण्यात आला होता त्या भितीमुळे पिस्टल बाळगल्याचे सांगत असुन

सदर आरोपीचे विरुध्द खुनाचा प्रयत्न, दरोडा, मारामारी, विनयभंग अशा प्रकारच्या गुन्हे दाखल आहेत. तसेच सदर आरोपी हा सध्या ठाणे जिल्हा व नवी मुंबई येथुन २ वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे पोलीस कर्मचारी अजय थोरात, अमोल पवार, वैभव स्वामी, अनिल घाडगे, बाबा चव्हाण यांनी केली आहे.